दिवाणी किरकोळ अर्ज नं.१६८/२०२२
**CNR NO. MHRG**060012042022

## <u>निशाणी क्र.१ वरील आदेश.</u>

अर्जदार याने सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २(अ) नुसार वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार याचे वडील **कै.विलास विठ्ठल भोईर** हे दि.१३/०३/२०१५ रोजी मु.पो. कोलेटी, ता.पेण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार याची आई **कै.रंजना विलास भोईर** हे दि.२९/०८/२०२२ रोजी मु.पो. कोलेटी, ता.पेण, जि.रायगड येथे मयत झाली आहे. अर्जदार हा कै.विलास विठ्ठल भोईर व कै.रंजना विलास भोईर यांचा कायदेशीर वारस आहे. तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस रायगड वृत्तवेधमध्ये दि.२२/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती **नि.क्र.१२** कडे दाखल आहे. दि.२२/१०/२०२२ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. तसेच दि.०५/११/२०२२ रोजी **नि.क्र.७** वरील जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. सदर जाहिरनाम्यास कोणीही हरकत घेतली नाही.

४. या अर्जाच्या कामी अर्जदार याने कै.विलास विठ्ठल भोईर यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र.१८** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी कै.रंजना विलास भोईर यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र.१३** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार याने आपल्या आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत **नि.क्र.१४** कडे दाखल केली आहे. अर्जदार याने आपल्या रेशनकार्डची व्हेरिफाईड प्रत **नि.क्र.१५** कडे दाखल केली आहे. अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **नि.क्र.१९** कडे दाखल केली आहे.

५. अर्जदार याने या अर्जाच्या कामी **नि.क्र.११** वर आपला पुरावा नोंदविलेला आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन कै.विलास विठ्ठल भोईर व कै.रंजना

विलास भोईर यांना अर्जदार हा सरळ कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार यास सदरचा वारस दाखला कायदेशीर कामाकरिता आवश्यक असल्याने त्याने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, पुरावा पहाता अर्जदार हा कायदेशीर वारस असल्याची औपचारिकपणे मान्यता देण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार कु.सुश्रीत विलास भोईर हा कै.विलास विठ्ठल भोईर व कै.रंजना विलास भोईर यांचा कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारास वारस दाखला देण्यात येत आहे.

३. वारसाचे प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायदयाप्रमाणे अर्जदारांनी योग्य तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

**पेण.**
**दिः १३.१२.२०२२.**

**(श्रीमती आर. एन. मुजावर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पेण.**

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order".

| | |
|---|---|
| Name of the stenographer | : Shri. A. A. Nakhawa |
| Name of the Court | : Smt. R. N. Mujawar<br>Civil Judge, J.D.and J.M.F.C. Pen. |
| Date of Decision | : 13-12-2022 |
| Order signed by presiding officer | : 13-12-2022 |
| Date of PDF | : 13-12-2022 |
| Order uploaded on | : 13-12-2022 |